**CNR No.MHNG080006042026**

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३३/२०२६
रेखा जगदिश झारपुरे विरुध्द महाराष्ट्र सरकार
अपराध क्र.४८/२०२६, पो.स्टे. नवीन कामठी

निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, सरकारी वकील व तपासी अधिकारी यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. अर्जदार आणि सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र.३ कडील कागदपत्रांच्या यादीसह सादर करण्यात आलेल्या अर्जदारांच्या आधार कार्डची पडताळलेली प्रत, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची पडताळलेली प्रत व एफ.आय.आर ची प्रत इत्यादी कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर कागदपत्रांवरुन सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. अर्जदार याच्या व्यतिरिक्त इतर कोणीही आजतागायत सदरच्या वाहनवर हक्क सांगितला नाही. सदरचे वाहन पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास त्याची हानी होऊ शकते. याशिवाय, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार देण्यात येणारा मुद्देमालाचा ताबा हा तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. या सर्व बाबींचा विचार केला असता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल, या मतास मी पोहचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अपराध क्र.४८/२०२६, नवीन कामठी पोलिस स्टेशन यातील जप्त मुद्देमाल म्हणजेच "Bolero Pickup bearing Registration No.MH-31-FH-9713, ENG.No.JE39ET5002777, CHAS. No. ME4JF39JEJT0 01894" वाहन हे अर्जदार याला रक्कम रुपये ४०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस हजार फक्त) च्या सुपुर्तनाम्यावर परत देण्यात यावा.

३. तपासी अधिकारी, पोलीस स्टेशन नवीन कामठी यांनी वर नमूद वाहनाच्या मुळ कागदपत्राची व चालू कालावधीच्या विमा कागदपत्राची पडताळणी करुन सविस्तर पंचनामा केल्यानंतर वाहन हे अर्जदार चे ताब्यात द्यावे.

४. अर्जदार ने मुद्देमाल यात कुठलाही बदल करु नये.

५. अर्जदारने तपासी अधिकारी अथवा न्यायालय सांगेल त्यावेळेस मुद्देमाल तपासी अधिकारी किंवा न्यायालया समक्ष हजर करावा.

६. सदर मुद्देमाल ताब्यात देताना तपासणी अंमलदाराने त्यांच्या कडील असलेल्या मुद्देमाल रजिस्टरचा उतारा दोषारोप पत्रात दाखल करावा.

७. सदर मुद्देमाल परत करताना तपासी अंमलदार यांनी या मुद्देमालाची तीन रंगीत छायाचित्रे काढून ती खटल्याच्या निकालापर्यंत जतन करुन ठेवावीत.

८. अर्जदार यांनी बंधपत्र संबंधित पोलीस ठाण्यात सादर करावे. तपास अधिकारी, नवीन कामठी पोलीस स्टेशन यांना पत्र जारी करण्यात यावे.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषित.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.03.11 11:01:33 +0530

ठिकाणी - कामठी
दिनांक – १०/०३/२०२६

(एम.आर. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्या.क्र.१, कामठी.